# कोल्हापूर जिल्हा परिषद, कोल्हापूर
# स्थायी समिती सभा क्र.७४, २०१६/१७

शुक्रवार, दिनांक - ०९/१२/२०१६

------------------ ◎ ◎ ◎ ◎ ◎ ◎ ------------------

## कार्यवृत्तांत

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या, स्थायी समितीची सभा शुक्रवार,दिनांक- ०९/१२/२०१६ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हा परिषदेच्या स्वर्गीय वसंतराव नाईक सभागृहात आयोजीत केली होती. सदर सभेचा कार्यवृतांत खालील प्रमाणे -

**हजर सदस्य**

| | | |
|---|---|---|
| १. | मा. विमल पुंडलिक पाटील | अध्यक्ष तथा सभापती स्थायी समिती |
| २. | मा. शशिकांत शामराव खोत | सदस्य |
| ३. | मा. अभिजित प्रभाकर तायशेटे | सदस्य |
| ४. | मा.सिमा विजय पाटील | सदस्य |
| ५. | मा. ज्योतीताई दिपक पाटील | सदस्य |
| ६. | मा. किरण सुकुमार कांबळे | सदस्य |
| ७. | मा. निता उर्फ संजीवनी प्रकाश परिट | सदस्य |
| ८. | मा. भाग्यश्री भारत पाटील | सदस्य |
| ९. | मा. धैर्यशिल संभाजीराव माने | सदस्य |
| १०. | मा. बाजीराव पुंडलिक पाटील | सदस्य |
| ११. | मा. अप्पी उर्फ विनायकराव विरगोंडराव पाटील | सदस्य |
| १२. | मा. संजयसिंह सदाशिवराव मंडलिक | सदस्य |
| १३. | मा. हिंदूराव दादू चौगले | सदस्य |
| १४. | मा.उमेश मुकुंदराव आपटे | सदस्य |

येणेप्रमाणे सन्मा. १४ समिती सदस्य, मा.मुख्य कार्यकारी अधिकारी व संबंधीत खाते प्रमुख, अधिकारी उपस्थित झाले व कामकाजास सुरवात झाली.

**मा.अध्यक्ष :-** विषय समितीचे सभापती, मुख्य कार्यकारी अधिकारी, समिती सदस्य, सर्व खाते प्रमुख, उपस्थित अधिकारी व कर्मचारी यांचे स्वागत करते. आजच्या सभेचे कामकाज सुरु करुया.

तद्नंतर सभेमध्ये खालीलप्रमाणे चर्चा व ठराव करण्यात आले.

**सचिव :-** मा.अध्यक्ष,मा.उपाध्यक्ष व पदाधिकारी यांना विनंती करतो की, सभेची सुरुवात होणेपूर्वी सेवा निवृत्त कर्मचारी यांचा आनंदी सेवा दिनचा कार्यक्रम करुन घेवूया.

तद्नंतर नोव्हेंबर २०१६ अखेर सेवा निवृत्त कर्मचाऱ्यांचा शाल श्रीफळ देवून मा.अध्यक्ष,मा.उपाध्यक्ष, पदाधिकारी व सदस्यांच्या हस्ते सत्कार करणेत आला. तसेच कोल्हापूर जिल्हा परिषद कर्मचारी कलामंच यांचे मार्फत गणेश उत्सवातील शिल्लक रकमेतून जिल्हा परिषदेतील वाचनालयासाठी रु.२० हजाराची कायदेविषयक व महत्वाची आवश्यक पुस्तके दिलेने कलामंचच्या सदस्यांचे अभिनंदन करण्यात आले व मा.मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे पुस्तके सुपूर्द करणेत आली.

**मा.मु.का.अ. :-** सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांना सेवा निवृत्तीचे लाभ तातडीने दिले जातील याची ग्वाही देतो. यापुढे सेवा निवृत्तीधारकांचे पीपीओ वेळीच होतील असे नियोजन करत आहे. सेवा निवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांनी आपले पैसे जपून वापरावेत. आपणास व आपल्या कुटुंबियास माझ्या शुभेच्छा.

**मा.अध्यक्ष :-** माझ्याकडूनही सर्वांना शुभेच्छा.

**सचिव :-** अभिनंदनाचे व दुखवटयाचे ठराव घ्यावेत.

**मा.धर्यशिल माने :-** तामिळनाडू राज्याच्या मुख्यमंत्री जयललीता,पंजाब बॉर्डरवर सांगलीचा जवान शहीद तसेच जि.प.माजी सदस्य सावंत यांचे दुखद निधन झाले आहे तसेच ज्ञात अज्ञात व्यक्तींचे निधन झाले आहे. त्यांना सभागृहामध्ये दोन मिनिटाची श्रध्दांजली वाहून दुखवटयाचे ठराव घेवूया.

यानंतर श्रध्दांजली वाहून खालील प्रमाणे दुखवटयाचे ठराव करणेत आले.

**दुखवटयाचा ठराव**

**ठराव क्र. १२४२ दिनांक ०९/१२/२०१६**

**विषय :- तामिळनाडू जयललिता यांना श्रध्दांजली वाहून सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.**

तामिळनाडूतील जनतेच्या लाडक्या `अम्मा`आणि मुख्यमंत्री जयललिता जयरामन ऊर्फ जे.जयललिता (वय ६८) यांचे सोमवारी रात्री साडेअकरा वाजता निधन झाले आहे. गेले ७४ दिवस त्यांची अपोलो रुग्णालयात मृत्यूशी झुंज सुरु होती. ती अयशस्वी ठरली. गेली तीन दशके त्यांनी तामिळनाडूच्या राजकारणावर अधिराज्य गाजविले. गरीब जनतेसाठी राबविलेल्या अनेक योजनांमुळे अम्मा सामान्य नागरिकांत तुफान लोकप्रिय ठरल्या होत्या. देशाच्या राजकारणात ही त्यांनी तितक्याच ताकदीने छाप उमटविली होती. सभागृहाच्या वतीने कै. जयललिता यांना श्रध्दांजली वाहून सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक - मा.धैर्यशिल संभाजीराव माने
अनुमोदक - मा.हिंदुराव दादु चौगले
सूचना सर्वानुमते मंजूर

**दुखवटयाचा ठराव**

**ठराव क्र. १२४३ दिनांक ०९/१२/२०१६**

बानगे ता.कागल येथील जि.प.माजी सदस्य श्री.वसंतराव गणपतराव सावंत (वय ९३) यांचे वृध्दापकाळाने निधन झाले. श्री.सावंत हे बानगे गावचे ३५ वर्षे सरपंच होते. सदस्य,पंचायत समिती सदस्य ते जिल्हा परिषद माजी सदस्य असा त्यांचा प्रवास प्रेरणादायी आहे. सन १९९२ ते १९९७ या कालावधीत त्यांनी जिल्हा परिषद सदस्य पदावर कामकाज केले आहे. त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य गोरगरीब आणि सर्वसामान्यांसाठी खर्ची घातले. आपल्या कार्य कालावधीत त्यांनी जिल्हयाचा विचार करुन ज्या ज्या शासकीय योजना येतील त्या त्या मार्गी लावण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला. सभागृहाच्या वतीने कै. सावंत यांना श्रध्दांजली वाहून सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक - मा. संजयसिंह सदाशिवराव मंडलिक
अनुमोदक- मा.अप्पी उर्फ विनायकराव विरगोंडराव पाटील
सूचना सर्वानुमते मंजूर

**दुखवटयाचा ठराव**

**विषय :- जम्मू काश्मिर हल्ल्यात सांगलीचे जवान शहीद झाले यांना श्रध्दांजली वाहून सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.**

**ठराव क्र. १२४४ दिनांक ०९/१२/२०१६**

**शुक्रवार** दिनांक २८/१०/२०१६ रोजी कुपवाडा जिल्हयात जम्मू काश्मिर सीमेवर पाकिस्तानी सैनिकांनी केलेल्या गोळीबारामध्ये श्री.नितीन सुभाष कोळी रा.दूधगांव ता.मिरज जि.सांगली हे शहीद झाले आहेत. या दु:खद घटनेबाबत सभागृहाने स्तब्धता पाळून श्री.नितीन कोळी यांना श्रध्दांजली वाहिली व सर्वानुमते दुखवटयाचा ठराव करणेत आला.

सुचक - मा.संजयसिंह सदाशिवराव मंडलिक
अनुमोदक - मा.हिंदुराव दादू चौगले
सूचना सर्वानुमते मंजूर

**मा.बाजीराव पाटील :-** शासनाने लाभार्थींच्या नावावर थेट अनुदान वर्ग करणेचा निर्णय घेतलेने शासनाचे अभिनंदन करतो. शासनाचा जी.आर.मिळालेनंतर मा.मु.का.अ.यांनी निर्णयाप्रमाणे अंमलबजावणी करावी अशी विनंती करतो.

**विषय क्र. १ - महत्वाचे शासन निर्णय / परिपत्रके वाचन करणे.**

**मा.धैर्यशिल माने :-** वैयक्तिक लाभाच्या योजनेतील पैसे थेट लाभार्थ्यांच्या बँक खातेवर जमा करणेबाबत सरकारने घेतलेला निर्णय कौतुकास्पद आहे. यापूर्वी दरकरारातील वस्तू खरेदी करताना दर्जाबाबत वर्षानुवर्षे तक्रारी असायच्या. याबाबत आम्हां लोकप्रतिनिधी व जिल्हा परिषदेला सामोरे जावे लागते. थेट लाभार्थ्यांच्या नावावर पैसे जमा होणार असल्याने पारदर्शकता येणार आहे. यासाठी शासनाने निर्णय घेतलेला आहे. लाभार्थी निवड हा वेगळा विषय आहे. वस्तू खरेदीमध्ये क्वालिटीच्या वस्तू मिळतीलच याची गॅरंटी नसते. या शासनाच्या जी.आर.मुळे शेवटच्या घटकापर्यंत लाभार्थ्यांला लाभ मिळणार आहे. निर्णय योग्य आहे. यासाठी लाभार्थ्यांच्या खात्यांवर पैसे वर्ग करण्यासाठी मी विनंती करतो.

**मा.सभापती स.क. :-** या निर्णयामध्ये लाभार्थीने स्वत: १०० % पैसे घालून वस्तू खरेदी करावयाची आहे. झेरॉक्स मशीन, शिलाई मशीन यांच्या किंमतीचा विचार करता लाभार्थींची आर्थिक परिस्थिती विचारात घेता हे शक्य होणार आहे काय ? या प्रणालीमध्ये बदल होणे गरजेचे आहे.

**मा.सभापती शिक्षण :-** अपंग व्यक्तीकडे झेरॉक्स मशिन खरेदीसाठी रु.५० हजार असणे शक्य नाही. या आर्थिक वर्षात धोरण ठरवूया कि लाभार्थ्यांना वस्तू देवूया. शासनाने निर्णय घेतलेला आहे. त्यात बदल करावा लागतो. थोडा विचार करुन बदल करायला पाहिजे.

**मा.धैर्यशिल माने :-** जि.प.ने वस्तू ऐवजी पैसे थेट बँकेत जमा करायला पाहिजे. यासाठी बदल सुचवा.

**मा.सभापती शिक्षण :-** यावर्षी तारखेनुसार वस्तू वाटपाचे नियोजन ठरले आहे. तथापि शासनाने हे आर्थिक वर्ष संपलेनंतर निर्णय घ्यायला हवा होता. आम्ही २ वर्षाच्या वस्तू वाटपाचे नियोजन केले आहे.

**मा.धैर्यशिल माने :-** ज्या त्या वर्षी पैसे खर्च केले असते तर हा प्रश्न आला नसता.

**मा.सभापती स.क. :-** गेली २ वर्षे टेंडर प्रक्रिया झालेली नाही. तसेच लाभार्थ्यांचे फॉर्म भरुन अकौंट उघडणे या प्रोसेससाठी वेळ लागणार आहे. आधारकार्ड घेणे कंम्पलसरी आहे. हे पंधरा दिवसात होणे कठीण आहे.

**मा.सभापती शिक्षण :-** प्रत्येक मतदार संघातील लाभार्थ्यांची नावे निश्चित करणेत आलेली आहेत. त्यांची फॉर्म देवून फसवणूक केल्यासारखे होईल.

**मा.सभापती स.क. :-** या निर्णयामुळे लाभार्थ्यांनी प्रथम वस्तू खरेदी करावयाची आहे. म्हणजे लाभार्थ्यांनी वस्तूचे पैसे दयावे लागणार आहेत.

**मा.धैर्यशिल माने :-** मा.मु.का.अ.यांनी जो निर्णय घेतील त्याला आमची मान्यता आहे. या योजनेमध्ये कांही उणीव असेल तर सीईओ साहेबांनी सांगावे.

**मा.उपाध्यक्ष :-** शिलाई मशीन, सायकलच्या निविदेची प्रक्रिया झालेली नाही. दि.३०/११/२०१६ च्या जी.बी.मध्ये मान्यता दिलेली आहे आणि शासनाचा जी.आर.हा दि.६/१२/२०१६ ला झालेला आहे. यात दोष कोणाचा ?

**मा.सभापती शिक्षण :-** एखादया वस्तूची किंमत ठरवावयाचे अधिकार कोणाचे आहेत.

**मा.सभापती स.क. :-** रक्कम लवकर उपलब्ध होणार नाही. शासन निर्णय दि.६ डिसेंबर २०१६ मधील मुददा क्र.४ प्रमाणे अभिप्राय मागविणे बाबत ठराव करुया.

**मा.उपाध्यक्ष :-** मुददा क्र.४ प्रमाणे ठराव घ्या. जे लाभार्थी देणार आहेत त्यापैकी ५० टक्के लोकांची खाती नाहीत.

**मु.ले.व वि.अ. :-** तसा ठराव करणेत यावा. वस्तूबाबत स्पेसिफिकेशन ठरविणे, विकत घेण्यासाठी अनुदान ठरविणे, लाभार्थी यादी तयार करणे, आधारकार्ड लिंक करणे, वेबसाईट, किंमत ठरविणेसाठी शासनास कळविणेत यावे. डी.जी.एम. शासनाची वेबसाईट आहे. आधार म्हणून बाजारामुल्य तपासणे व त्याआधारे १० टक्के कमी अधिक दर करता येतात.

**मा.मु.का.अ. :-** या संदर्भात एक बैठक घेणे गरजेचे आहे.

**मा.हिंदुराव चौगले :-** लवकर मिटींग बोलवून निर्णय घ्या. लाभार्थी निवडीत शंका घेणे चुकीचे आहे. यामुळे ५० टक्के कामाचा बोजवारा उडणार आहे. लोकांना कितपत योग्य वाटते ते बघुया.

**चर्चेतून करणेत आलेला ठराव**

**विषय :- सन २०१६-१७ या आर्थिक वर्षात महिला बालकल्याण व समाजकल्याण विभागाकडील निविदा प्रक्रियेव्दारे खरेदी केलेल्या दरानुसार पुरवठा आदेश देणेस ग्राम विकास विभागाची मंजूरी मिळणेबाबत. (स.क.)**

**ठराव क्र. १२४५** **दिनांक : ०९/१२/२०१६**

जिल्हा समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर या कार्यालयाने मागासवर्गीयांसाठी राखीव असलेल्या २०% सेसफंडातून सन २०१६-१७ या आर्थिक वर्षामध्ये खालील योजना हाती घेतल्या आहेत:-

| क्र. | योजनेचे नांव | तरतूद (लाखात) |
|---|---|---|
| १ | ग्रामीण भागातील मुलींना सायकल पुरविणे | |
| | अ) समाजकल्याण विभागाने केलेली तरतूद | रु. ३०.०० |
| | ब) महिला बालकल्याण विभागाने केलेली तरतूद | रु. ५०.०० |
| २ | शिलाई मशिन पुरविणे | |
| | अ) समाजकल्याण विभागाने केलेली तरतूद | रु. ६०.०० |
| | ब) महिला बालकल्याण विभागाने केलेली तरतूद | रु. ९७.१० |
| | | |
| ३ | मागासवर्गीयांना झेरॉक्स मशिन पुरविणे | रु ९०.०० |
| | **एकूण** | **रु. ३२७.१०** |

उपरोक्त योजनांपैकी अ.क्र. १ व २ मधील योजनांसाठी समाजकल्याण विभागाने ई-निविदा प्रक्रियेचा अवलंब केला आहे त्या अनुषंगाने विभागाने मा. जिल्हा परिषद सर्वसाधारण सभा दि. ३०/११/२०१६ मधील ठराव १२४६, १२८५ व १२८८ नुसार न्यूनतम दरास खरेदी करण्यास मंजूरी घेतली आहे.

| क्र. | योजनेचे नांव | पुरवठादाराचे नांव | दर |
|---|---|---|---|
| १ | ग्रामीण भागातील मुलींना सायकल पुरविणे | जिनेश्वर सप्लायर्स, बीड | रु. ३४१२/- |
| २ | शिलाई मशिन पुरविणे | जयवर्धन मार्केटींग, सांगली | रु. ३६००/- |
| ३ | मागासवर्गीयांना झेरॉक्स मशिन पुरविणे | क्योसेरा डॉक्युमेंट सोलुशन्स प्रा.लि.मुंबई | रु. ४४,४१४/- |

उपरोक्त वस्तुस्थितीच्या अनुषंगाने संबंधितास पुरवठा आदेश देण्यापूर्वी शासनाच्या नियोजन विभागाचा शासन निर्णय क्र. डिसीटी २३१६/प्र.क्र.१३३/का-१४१७, दिनांक ५ डिसेंबर, २०१६ प्राप्त झाला आहे. सदर शासन निर्णयामध्ये असे नमुद केले आहे की, शासकीय, निमशासकीय कार्यालये, स्थानिक स्वराज्य संस्था व विविध महामंडळामार्फत राबविण्यात येणाऱ्या वैयक्तिक लाभाच्या योजनांच्या अनुषंगाने कोणत्याही प्रकारचे साहित्य खरेदी न करता संबंधित साहित्याची किंमत निर्धारीत करुन ती संबंधित लाभार्थ्यांच्या खात्यात थेट जमा करावी. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने उपरोक्त तिनही योजनांतर्गत करावयाची खरेदी प्रक्रिया स्थगित करणेत आली आहे.

सदर प्रकरणी नमूद करण्यात येते की, क्र.२ मधील योजना सन २०१४-१५ व २०१५-१६ मध्ये समाजकल्याण विभागामार्फत घेण्यात आली होती मात्र ती तांत्रिक कारणास्तव राबविता आली नाही. सोबतच क्र. २ मधील योजना सन २०१५-१६ मध्ये घेण्यात आली होती तीही तांत्रिक कारणास्तव राबविता आली नाही त्यामुळे या दोन्ही योजनांचे पात्र लाभार्थी गेल्या दोन वर्षापासून वस्तू मिळण्याच्या प्रतिक्षेत आहेत. शासनाच्या दि. ५ डिसेंबर, २०१६ च्या शासन निर्णयानुसार साहित्य खरेदीची प्रक्रिया स्थगित झाल्याने सदर लाभार्थ्यांना वस्तूरुपात लाभ देणे गैरसोयीचे झाले आहे. नजिकच्या काळात जिल्हा परिषद निवडणुकीची आचारसंहीता लागणार असल्याने व नविन कार्यपध्दतीनुसार लाभार्थ्यांच्या अर्जाबाबत त्यांच्याकडून आधारकार्डाची सत्यप्रत व त्यांच्या बँक खात्याचा तपशील (बँकेचे नांव, खाते क्रमांक, आयएफएससी कोड, पासबुकाची सत्यप्रत इ.) प्राप्त करुन घेण्यास वेळ लागणार असल्याने लाभार्थ्याच्या खाती वस्तूची किमंत वर्ग करण्यास विलंब होण्याची शक्यता आहे. तसेच लाभार्थ्यानी स्वत:चे पैसे खर्च करून वस्तू खरेदी केल्यानंतर अनुदानाची रक्कम वर्ग करावयाची असल्याने लाभार्थ्यांची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता त्यांना अनुदान मिळण्यापूर्वी वस्तू खरेदी करणे शक्य होणार नाही. यासर्व बाबी लक्षात घेता उपरोक्त योजनांच्या अनुषंगाने वस्तुची किंमत लाभार्थ्याच्या खात्यावर जमा करण्याऐवजी सदरचे साहित्य खरेदी करुन ते लाभार्थ्यांना वाटप करणे आवश्यक आहे. करीता अ.क्र. १ ते ३ मधील योजनांतर्गत साहित्य खरेदी करण्यासाठी शासनाची परवानगी मिळण्यासाठी प्रस्ताव पाठविणेत यावा असे सर्वानुमते ठरले.

याबाबत सदस्य सचिव तथा उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन विभाग) यांनी असे मत मांडले की, ' नियोजन विभागाकडील शासन निर्णय दिनांक ५ डिसेंबर, २०१६ नुसार वस्तू व सेवा खरेदी न करता वस्तुंची किंमत थेट लाभार्थ्याच्या खात्यावर जमा करावी असे निर्देश दिले आहेत त्यामुळे वस्तुंची खरेदी करता येणार नाही.' सदर अभिप्रायास मा. मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सहमती दर्शविली तसेच याबाबत जिल्हा समाजकल्याण अधिकारी यांनी असे अभिप्राय नोंदविले की, दि. ५ डिसेंबर २०१६ च्या शासन निर्णयातील तरतूदीनुसार साहित्य खरेदी न करता साहित्याची किंमत लाभार्थ्याच्या खात्यात जमा करण्यासाठी कोणत्याही प्रकारची अडचण नाही त्यामुळे ती शक्य तितक्या लवकर लाभार्थ्याच्या खाती जमा करणेत येईल. दरम्यान ग्रामविकास विभागाच्या पत्र क्र.संकीर्ण-२०१६/प्र.क्र.०९/ शिकाना, दिनांक ६ डिसेंबर, २०१६ मधील मार्गदर्शक सूचना क्र. ४ मध्ये असे नमूद केले आहे की, 'ज्या जिल्हयांना कार्यवाही करणे शक्य नसेल, किंवा ही वस्तू रोख स्वरूपाऐवजी वस्तू स्वरुपात देणे जासत रास्त वाटत असेल, त्या जिल्हयांनी त्यांचे अशा प्रकारचे वस्तू खरेदीचे प्रस्ताव खरेदीच्या समर्थनीय उचित कारणासह ग्राम विकास विभागाकडे पाठवून शासनाच्या पूर्व मान्यतेनेच अशा प्रकारची खरेदी करणे बंधनकारक राहील.'

सुचक - मा. किरण सुकुमार कांबळे
अनुमोदक - मा. ज्योतीताई दिपक पाटील
सूचना सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.२ :- जिल्हा परिषदेच्या जागा व इमारती विकसीत करुन उत्पन्नात वाढ करणेबाबत कार्यवाहीचा आढावा.**
**आढावा बाबत चर्चा झालेली नाही.**

**मा.उपाध्यक्ष :-** जि.प.च्या जागा विकसीत करुन उत्पन्न वाढीसाठी काय केले ते सांगा ?

**मा.हिंदुराव चौगले :-** विषय सोडून द्या. गेली ५ वर्षे तेच तेच ऐकत आलो आहे.

**कार्य.अभि.(बांध) :-** भाऊसिंगजीरोडवरील जि.प.च्या दुकानगाळे असलेल्या इमारतीच्या कोर्ट केससाठी पूर्वीचा वकील बदलून श्री.मिलींद गुरव, वकील यांना नेमणेत आले आहे. २०१३ चा गाळेधारकांचा करार संपला आहे. भाडे वाढ केली तर कोर्टात जातात.

**मा.सभापती शिक्षण :-** भाडे करार संपला आहे म्हणून दुकानगाळे रिकामे करणेस सांगा.

**मा.हिंदुराव चौगले :-** संगनमताने सर्व कामे चालू असल्याने त्यांना फायदा होतो असे आता आम्हाला वाटत आहे.

**मा.मु.का.अ. :-** महानगरपालिकेकडून निर्लेखन करुन ताबा घेणे संदर्भात कार्यवाही चालू आहे. यांत कोर्टाने स्टे दिलेला आहे.

**मा.धैर्यशिल माने :-** याबाबत प्रशासनाला कांहीही माहिती नव्हती.

**मा.मु.का.अ. :-** धोकादायक व पडायला आलेल्या इमारतीला स्टे दिलेला आहे. आम्ही प्रयत्न करीत आहोत. भाडे वाढ केली म्हणूनच गाळेधारक कोर्टात गेले आहेत.

**मा.धर्यशिल माने :-** प्रत्येक वेळी सभागृहात ठरते त्याची अम्मलबजावणी होत नाही.

**कार्य.अभि.(बांध.) :-** कोर्टात केस असताना ताबा घेवू शकत नाही.

**मा.धर्यशिल माने :-** कोर्ट धोकादायक इमारतीला स्थगिती देवू शकते हे शक्य नाही. कोर्ट स्टे दिला तो कोणत्या नॉर्म्सवर ?

**मा.मु.का.अ. :-** विधी कक्षामार्फत आपणास माहिती देण्यात येईल.

**मा.उपाध्यक्ष :-** मा.मु.का.अ.व मा.आयुक्त यांनी चर्चा करुन इमारत पाडण्याची कारवाई करावी.

**कार्य.अभि.(बांध) :-** आपल्या जिल्हा परिषदेची रेस्ट हाऊस, आऊट हाऊस करणेसाठी टेंडर फलॅश करतो. दाजीपूर, पन्हाळा, गगनबावडा, गडहिंग्लज बीओटी मान्य झाल्यानंतर होणार आहे.

**मा.उपाध्यक्ष :-** कागल दवाखान्याच्या जागेत अतिक्रमण होत आहे कंपौड घाला. मोक्याची जागा आहे, बाजार भावांप्रमाणे फार किंमत आहे. याबाबत योग्य ती कार्यवाही करणेत यावी.

**मा.हिंदुराव चौगले :-** इतर जागादेखील डेव्हलप करुन उत्पन्न वाढवा.

**मा.उपाध्यक्ष :-** मा.उमेश आपटेसाहेब अध्यक्ष असताना माहिती घेतली आहे. शाळा आवाराची ५४ एकर जागा आहे, ती ताब्यात घ्या.

**मा.मु.का.अ. :-** विस्तार अधिकारी शिक्षण यांचेकडून सविस्तर मी माहिती घेत आहे. अगोदर शाळांच्या जागा ताब्यात घेणेची प्रक्रिया सुरु करा.

**शिक्षण अधि.(प्राथ) :-** कांही तालुक्याची माहिती घेतलेली आहे. कांही माहिती यावयाची आहे.

**मा.सभापती शिक्षण :-** शाळेची प्रॉपर्टी आहे पण ती कोणीतरी शाळेसाठी दान केलेली असते. अशा वेगवेगळया ठिकाणी जागा आहेत. पण बरेच ठिकाणी वेगवेगळया शाळेच्या जागा आहेत. मुळ मालकांच्या नावाने जागा आहेत त्या जि.प.च्या नावांवर करुन घेणेची कार्यवाही सत्वर करणेत यावी.

**मा.मु.का.अ. :-** प्रथम नावावर करुन घेण्याची कार्यवाही करणेत यावी.

**मा.हिंदुराव चौगले :-** कदमवाडी येथील बापटकँप येथे जागा आहे माहिती घ्या. सदरची जागा विकसीत केलेस जि.प.चे उत्पन्न वाढेल.

**कार्य.अभि.(बांध.) :-** माहिती घेतो.

**मा.हिंदुराव चौगले :-** लिगल प्रोसेस आहे ती अगोदर करा.

**मा.मु.का.अ. :-** BSNL ची बैठक झाली त्याबाबत कार्य.अभि. यांनी माहिती द्यावी.

**कार्य.अभि.(बांध) :-** BSNL बरोबर दि.१८/११/२०१६ रोजी बैठक झाली आहे. आठ तालुक्यात कामे झालेली आहेत. खराब झालेले रस्ते दि.३१/१२/२०१६ पर्यंत मंडल अभियंता यांनी रस्ते दुरुस्त करणेचे मान्य केले आहे.

**मा.हिंदुराव चौगले :-** काय कामे पूर्ण करतात तशीच कामे अपूर्ण ठेवली आहेत.

**बीएसएनएल प्रतिनिधी :-** त्रिपक्षीय बैठक झाली आहे. त्यामध्ये कोणाचीही परवानगी घेणेची आवश्यकता नाही. ज्या भागात काम करणार तेथील लोकांची परवानगी घेतोय.

**मा.हिंदुराव चौगले :-** तुमच्या लोकांनी कशीही खुदाई केली आहे.

**मा.धैर्यशिल माने :-** एखादा रस्ता खराब झाला असेल तर दुरुस्त करुन देणेची जबाबदारी कोणाची आहे.

**बीएसएनएल प्रतिनिधी :-** नुकसान भरपाई देणार आहे.

**मा.धैर्यशिल माने :-** बीएसएनएल ने असे किती रस्ते दुरुस्त केले आहेत.

**बीएसएनएल प्रतिनिधी :-** आम्ही रस्ते पूर्ववत करायला लागलो आहोत.

**मा.हिंदुराव चौगले :-** डांबरी रस्त्यापासून काम चुकीचे पध्दतीने केले जात आहे. डांबरी रस्ता लगतच खुदाई सुरु आहे. रस्ते कशाला उकरता. ते दुरुस्त सुध्दा करीत नाही. तुमचे हे काम बरोबर नाही.

**बीएसएनएल प्रतिनिधी :-** नाही आम्ही रस्ते दुरुस्त केले आहेत.
**मा.उपाध्यक्ष :-** जेथे जेथे खुदाई केली आहे तेथे डांबरीकरण केले आहे असे उदाहरण द्या.
**बीएसएनएल प्रतिनिधी :-** जेथे जेथे खुदाई झाली आहे तेथे दुरुस्ती करणार आहे. उदाहरण दयावयाचे झालेस दऱ्याचे वडगांव येथे तसे काम सुरु केले आहे.
**मा.मु.का.अ. :-** यापूर्वी किती नुकसान झाले आहे ते बीएसएनएल ला कळविले आहे.
**मा.उपाध्यक्ष :-** एकूण ५ कोटी ८६ लाख इतके नुकसाने झालेले आहे.
**मा.धैर्यशिल माने :-** दोन्ही विभागानी संयुक्त सर्व्हे करावा.
**मा.उपाध्यक्ष :-** काम बंद करा अगोदर पैसे भरावेत.
**मा.हिंदुराव चौगले :-** केबलच्या चरीवर मुरुम टाकला जातो. बाजूपटटया नवीन न केलेने पावसाळयात वाहने रुततात.
**मा.धैर्यशिल माने :-** कामे व्यवस्थित झाली पाहिजेत.
**मा.मु.का.अ. :-** जाईंट सर्व्हे करावा. मंगळवारपर्यत माहिती द्यावी. सार्वजनिक नुकसान होऊ नये याची दक्षता घ्यावी.
**मा.हिंदुराव चौगले :-** आमच्या वाडीभागात ५ जेसीबीव्दारा काम चालू आहे.
**कार्य.अभि.(बांध) :-** ठिकपूर्ली बारडवाडी काम थांबविले आहे.
**मा.बाजीराव पाटील :-** शिये फाटा येथील रस्ता बघावा.
**बीएसएनएल प्रतिनिधी :-** बीएसएनएलचे काम असेल तर आम्ही बीबीएनएल कडून करुन घेवू.
**मा.धैर्यशिल माने :-** जाईंट सर्व्हे प्रमाणे काम करुन घ्यावे.
**मा.हिंदुराव चौगले :-** इतर कंपन्याचे काय ?
**मा.मु.का.अ. :-** ग्राम पंचाययतीची परवानगी घेवूनच इतर कंपन्या कामे करतात.
**को.म.न.पा.प्रतिनिधी :-** दाजीपूर थेट पाणी पाईप लाईन तुरंबे गांवातील कामासाठी १.४९ लाख इतकी रक्कम जि.प.कडे भरली आहे.
**मा.हिंदुराव चौगले :-** परिते ते तुरंबे येथे जमीन पाईप वळसा घातला. रस्त्याच्या कडेला ३ ते ४ फूटावर पाईप बसविली आहे. याचा पुढे त्रास होणार आहे.
**मा.मु.का.अ. :-** रुट फायनल झाला आहे.
**मा.हिंदुराव चौगले :-** मी महानगरपालीकेचे अधिकारी यांचे समवेत चालत फिरलो आहे. डांबरी रस्ता सोडून खुदाई करण्यासाठी सांगितले आहे. तरीसुध्दा रस्त्या लगतच खुदाई सुरु आहे. जिथे क्रॉस आहे त्याबाबत मी बोलत नाही.
**मा.मु.का.अ. :-** पीडब्ल्यूडी व कोल्हापूर महानगरपालिका यांनी एकत्रीत येवून निर्णय घ्या.
**मा.हिंदुराव चौगले :-** नुकसान झाले तर त्याला जबाबदार कोण ? शेतकऱ्यांना नुकसान भरपाई दयावी लागते म्हणून रस्त्यालगतच खुदाई केली जात आहे. महानगरपालीकेने याची जबाबदारी घेतली पाहिजे.
**को.म.न.पा.प्रतिनिधी :-** शेतकऱ्यांच्या हद्दीत जात नाही. ९ मीटर पर्यंतच जाता येते.
**मा.हिंदुराव चौगले :-** मेन ॲप्रोच रस्ते आहेत त्यांनी नोंद करुन घेणे आवश्यक आहे.
**मा.मु.का.अ. :-** याबाबत पीडब्ल्यूडी यांचेशी चर्चा करुन बैठक घ्या. दोन्ही कार्यकारी अभियंता यांनी अधीक्षक अभियंता यांचे समवेत याबाबत बैठक लावा.
**मा.हिंदुराव चौगले :-** कायदयातून पळवाटा काढू नका. पाण्याचा प्रश्न आहे आम्ही आडवे येणार नाही. मंत्र्यांनी सुध्दा कळविले आहे. शेतकऱ्यांची नुकसान भरपाई द्या.
**मा.मु.का.अ. :-** संबंधित विभागाला माहिती पाहिजे.
**मा.हिंदुराव चौगले :-** पीडब्ल्यूडी कडील परिते ते शेळेवाडी या कामाबाबत काय ?
**सार्वजनिक बांधकाम प्रतिनिधी :-** परिते बाबत को.म.न.पा.यांना वारंवार कळविले आहे.
**मा.हिंदुराव चौगले :-** नाल्याच्या पलीकडे ९ मीटरच्या आत पाईप लाईन घाला.
**को.म.न.पा.प्रतिनिधी :-** शेतकऱ्याची हद्द येते. शेतकरी जागा देत नाही.
**मा.उपाध्यक्ष :-** बरोबर आहे. तुम्ही शेतकऱ्याला नुकसान भरपाई देत नाही तर शेतकरी जागा कशी देईल.

**विषय क्र.३ :- विषय समिती मधील घेणेत आलेल्या महत्वाच्या विषयावर चर्चा करणे.**

**विषय समिती मधील महत्वाचे विषयाबाबत चर्चा करणेत आली नाही.**

**विषय क्र. ४ :- जिल्हा परिषद, कोल्हापूर कडील माहे ऑक्टोंबर २०१६ ची जमा खर्चाची पत्रके अवलोकन करणेबाबत (अर्थ)**

**ठराव क्र.१२४६** **दिनांक ०९/१२/२०१६**

कोल्हापूर जिल्हा परिषदेची माहे **ऑक्टोंबर २०१६** ची जमा व खर्चाची पत्रके अवलोकन करण्यात आली. वित्त समितीने दिनांक ०६/१२/२०१६ ने केले शिफारशीनुसार त्यास मंजूरी देणेत येत आहे.

सुचक - मा. बाजीराव पुंडलिक पाटील
अनुमोदक - मा. धैर्यशिल संभाजीराव माने
सूचना सर्वानुमते मंजूर

**विषय क्र.५ :- ग्रामपंचायत विभागाकडील लेखा विषश्यक नोदवहया माहे जूलै २०१६ ते सप्टेंबर २०१६ अखेर पूर्ण / अपूर्ण असले बाबत. (ग्रापं.)**

**ठराव क्र.१२४७** **दिनांक ०९/१२/२०१६**

कोल्हापूर जिल्हा परिषदेच्या ग्रामपंचायत विभागाकडील लेखा विषयक नोंदवहया वहया **माहे जुलै २०१६ ते सप्टेंबर २०१६** अखेर पूर्ण असले बाबत अवलोकन करण्यात आले पूर्ण नोंदवहयांचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| अ. क्रं | नमुना नंबर | नोंदवही क्रंमाक व तपशिल | कर्मचा-यांचे नाव | पूर्ण / अपूर्ण |
|---|---|---|---|---|
| १ | १ | धनादेश नोंदवही(संबंधीतांकडील सर्व योजनांची व खात्यांची) जिल्हा ग्राम विकास निधी | श्री.के.जी.लांडे<br>श्री.एस.एस.पाटील | पूर्ण<br>पूर्ण |
| २ | ४ | पेटी कॅशबुक | श्री.के.जी.लांडे | पूर्ण |
| ३ | ६ | जामिन कदबा नोंदवही | | पूर्ण |
| ४ | ७ | जनरल रोजकिर्द (संबंधीतांकडील सर्व योजनांची व खात्यांची) जिल्हा ग्राम विकास निधी | श्री.एस.एस.पाटील | पूर्ण |
| ५ | १३ | जमा नोंदवही | श्री. आर.एम.गुरव | पूर्ण |
| ६ | १४ | खर्च नोंदवही | | पूर्ण |
| ७ | ३० | आकस्मिक खर्च नोंदवही | श्री.ए.एस.डोईफोडे | पूर्ण |
| ८ | ३१ | दुरध्वनी नोंदवही | | पूर्ण |
| ९ | ३२ | जंगम मालमत्ता नोंदवही | | पूर्ण |
| १० | ३३ | माल पुस्तक नोंदवही | | पूर्ण |
| ११ | ३७ | वाहन नोंदवही - हिस्ट्री बुक | श्री.के.जी.लांडे | पूर्ण |
| १२ | ३८ | वाहन नोंदवही - लॉक बुक | | पूर्ण |
| १३ | ८४ | गुंतवणुक नोंदवही | श्री.एस.एस.पाटील | पूर्ण |

वरील प्रमाणे लेखाविषयक नोंदवहया पूर्ण असलेने सदरच्या विषयास मंजूरी देणेत येत आहे.

सुचक - मा. निता उर्फ संजीवनी प्रकाश परिट
अनुमोदक - मा. भाग्यश्री भारत पाटील
सूचना सर्वानुमते मंजूर

विषय **क्र. ६ :- ग्रामपंचायत सोमवार पेठ, पन्हाळा येथील ग्रा.पं. मिळकत क्रमांक १७२ बाबत ग्रा.पं. मासिक सभा ठराव क्र.५९/१ व २ दि.२४/१/२०१२ व मासिक सभा ठराव क्र.५३/८ दि.३०/१२/२०१३ चा रद्द करणे बाबत. (ग्रापं.)**

**ग्रा.पं.विभाग प्रतिनिधी :-** ग्राम पंचायतीने केलेल्या ठरावाच्या विरोधात सदरचे अपील आहे. कलम १४२ नुसार ग्रामपंचायतीने बेकायदेशीर ठराव केला आहे.

**मा.उपाध्यक्ष :-** याबाबत प्रशासनाचे काय अभिप्राय आहेत.

**सचिव :-** ठराव बेकायदेशीर आहेत.

**मा.उपाध्यक्ष :-** नियमानुरुप ठराव करावा.

**ठराव क्र. १२४८** **दिनांक ०९/१२/२०१६**

श्री.वसंत गुंडाप्पा देवताळे, व इतर ३ ग्रामपंचायत सदस्य, रा.सोमवार पेठ, ता.पन्हाळा यांनी दिनांक २७/६/२०१६ अन्वये ग्रामपंचात सामेवार पेठ ता.पन्हाळा येथील ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १७२ बाबत ग्रामपंचायत मासिक सभा ठराव क्रमांक ५९/१ व २ दिनांक २४/१/२०१२ व मासिक सभा ठराव क्रमांक ५३/८ दिनांक ३०/१२ /२०१३ चा रद्द करणे बाबत अर्ज सादर केलेला होता. त्यानुसार इकडील पत्र क्र.जिप-पंचायत-वशि-९-तक्रार-११६४-१६,दिनांक ३०/६/२०१६ व पत्र क्र.जिप-पंचायत-वशि-९-तक्रार-१५११-१६, दिनांक १६/८/२०१६ अन्वये चौकशी करून अहवाल सादर करणे बाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती पन्हाळा यांना कळविलेले होते त्याअनुषंगाने गट विकास अधिकारी पंचायत समिती पन्हाळा यांचेकडुन अहवाल प्राप्त झालेला असुन, सदर अहवालातील तपशील खालील प्रमाणे आहे.

१. ग्रामपंचायत सोमवार पेठ ता. पन्हाळा येथील सदरची जागा गावठाण हद्दीतील असुन,भुमी अभिलेख पन्हाळा यांचेकडील मोजणी वरून गट नंबर ४६ मध्ये येत नसलेचे दिसुन येत आहे. सदरची मिळकत ग्रामपंचायत व महसुल दप्तरी कोठेही नोंद नाही, सदर मिळकत ही पडसर जागा असुन, स्थानिक चौकशी, जागेची स्थळ पाहणी व ग्रामपंचायत सोमवारपेठ ता.पन्हाळा कडील सरपंच,सदस्य,ग्रामसेवक व तक्रारदार यांचे सोबत संयुक्त रित्या स्थळ पाहणी पंचनाम्यावरून गावठाण मधील असलेचे गट विकास अधिकारी पंचायत समिती पन्हाळा यांनी नमुद केलेले आहे.

२. ग्रामपंचायत सोमवारपेठ ता. हातकणंगले यांनी मा.कार्यकारी दंडाधिकारी पन्हाळा यांचे समोर केलेल्या प्रतिज्ञापत्राच्या आधारे व त्यामधील चतु:सिमेनुसार ग्रामपंचायत मासिक सभा दिनांक २४/१/२०१२ ठराव क्रमांक ५९/१ व २ ने श्री. नारायण नाना कदम, रा.गुंडे यांचे नांवे ग्रामपंचायत नमुना नंबर ८ असेसमेंट पत्रकी नविनच मिळकत नंबर १७२ ची नोंद घेतलेली आहे. सदरची नोंद विहीत कार्यपध्दतीचा अवलंब न करता केलेली दिसुन येत आहे.

सदर प्रकरणाच्या अनुषंगाने चौकशी वेळी श्री. नारायण कदम यांचेकडे मालकी हक्काची कागदपत्रे मागणी केली असता, सदर मिळकती बाबत त्यांचेकडे प्रतिज्ञा पत्र, चतु:सिमाधारकांचे प्रतिज्ञापत्र एवढीच कागदपत्रे मालकी हक्काची आहेत असे दिनांक १७/१२/२०१५ रोजी लिहुन दिलेले आहे.

३. श्री.नारायण नाना कदम रा. गुंडे यांनी दुय्यम निबंधक पन्हाळा यांचेकडील रजिस्टर दस्त नंबर २२७९/२०१३ दिनांक १०/१०/२०१३ रोजी ने सॅक्रोसॅक्ट एज्युकेशन अँड रिसर्च फौंडेशन लि.तर्फे चेअरमन श्री. प्रकाश रामराव भोसले यांना रक्कम रुपये ३३२००००/-इतक्या किमतीस विक्री केलेली आहे. सदर रजिस्टर खरेदी पत्रानुसार ग्रामपंचायत सोमवारपेठ येथील मासिक सभा दिनांक ३०/१२/२०१३ ठराव क्रमांक ५३/८ ने ग्रामपंचायत नमुना नंबर ८ असेसेमेंट पत्रकी सॅक्रोसॅक्ट एज्युकेशन अँड रिसर्च फौंडेशन लि.तर्फे चेअरमन श्री. प्रकाश रामराव भोसले यांचे नांवे नोंद केलेली आहे.

४. सदर प्रकरणी गट विकास अधिकारी पंचायत समिती पन्हाळा यांचे मार्फत चौकशी करून सदर चौकशी अहवालाच्या अनुषंगाने तत्कालीन ग्रामसेविका श्रीमती सुशिला गुरूबसय्या हिरेमठ यांना इकडील कार्यालयाकडील पत्र क्र.कोजिप/पंचा./कावि-५/वशि/१८०/२०१६, दिनांक १२/२/२०१६ ने खाते निहाय चौकशी प्रस्ताव सादर करणे बाबत गट विकास अधिकारी पंचायत समिती पन्हाळा यांना कळविलेले आहे.

५. ग्रामपंचायत सोमवारपेठ येथील सदर बेकायदेशीर ठरावाच्या अनुषंगाने सरपंच,उपसरपंच व अन्य चार ग्रामपंचायत सदस्य यांचेवर जबाबदारी निश्चित करून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९(१) नुसार कारवाई प्रस्तावित केलेली होती. परंतु मे.उच्च न्यायालयातील निर्णयाचा संदर्भ व महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ चे कलम ३९ नुसार "पंचायतीची मुदत संपल्या नंतर अशी व्यक्ती पुन्हा निवडणुकीस उभी राहु शकेल आणि सरपंच किंवा उपसरपंच म्हणुन निवडुन येण्यास पात्र असेल तसेच पुर्वीचे मुदतीत अशा सदस्याने केलेल्या अगर न केलेल्या (कर्तव्य कसुरी) कारणासाठी तो पुन्हा निवडुन आल्यावर त्याला काढुन टाकता येत नाही" अशी तरतुद असुन ग्रामपंचायत सोमवार पेठ येथील जुन्या कार्यकारीणीचा कालावधी ३१/८/२०१० ते ३१/८/२०१५ असा असुन, नव्याने सार्वत्रिक निवडणुक दिनांक २५/७/२०१५ रोजी झालेली असुन, दिनांक ३१/८/२०१५ रोजी सरपंच निवडणुक होवुन नव्याने कार्यकारीणीचा कालावधी सुरू झालेला आहे. यास्तव तत्कालीन जबाबदार सरपंच, उपसरपंच व अन्य चार ग्रामपंचायत सदस्य यांचेवर महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९(१) नुसार कारवाई प्रस्तावित केलेली नाही.

६. ग्रामपंचायत सोमवारपेठ ता. पन्हाळा येथील मासिक सभा दिनांक २४/१/२०१२ ठराव क्रमांक ५९/१ व २ हे ठराव विधीग्राहय नसतील तर सदर ठरावाने नोंद घेतलेली मिळकत नंबर १७२ ही बेकायदेशीर नोंद आहे, आणि बेकायदेशीर नोंदी नुसार सदरची मिळकती बाबत नोंदणीकृत दस्ताच्या आधारे झालेला ठराव क्रमांक ५३/८ मासिक सभा दिनांक ३०/१०/२०१३ हा सुध्दा विधिग्राहय होवु शकत नाही त्यामुळे सदर ठरावाच्या आधारे केलेले फेरफार सुध्दा नियमानुकुल होवु शकत नाहीत.

सदर ग्रामपंचायत मिळकत नंबर १७२ बाबत मे. प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारीसो, पन्हाळा यांचे कोर्टात रेग्यु क्रि.के १३१/२०१५ ने दावा सुरू आहे. तसेच मा.अप्पर जिल्हाधिकारी (आरटीएस)कोल्हापूर यांचेकडे क्र. ००२०७ /२०१६ ने वाद विवाद अर्ज चालु आहे.

सदर मिळकती बाबत मे.न्यायालयामध्ये दावे दाखल असलेने सदर बाबत आपले स्तरावरून पंसतीनुरूप निर्णय घेणेत यावा अशी शिफारस गट विकास अधिकारी पंचायत समिती पन्हाळा यांनी केलेली आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती पाहता, ग्रामपंचायत सोमवारपेठ, ता. पन्हाळा कडील मासिक सभा ठराव क्रमांक ५९/१ व २ दिनांक २४/१/२०१२ व मासिक सभा ठराव क्रमांक ५३/८ दिनांक ३०/१२/२०१३ हा महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम १४२ अन्वये स्थगीत ठेवणे बाबत स्थायी समिती समोर सदरचा प्रस्ताव सादर केलेला होता.

उपरोक्त वस्तुस्थिती व सभे समोर झाले चर्चेअंती सदर प्रकरणी ग्रामपंचायत सोमवार पेठ ता. पन्हाळा येथील ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १७२ बाबत ग्रामपंचायत मासिक सभा ठराव क्रमांक ५९/१ व २ दिनांक २४/१/२०१२ व मासिक सभा ठराव क्रमांक ५३/८ दिनांक ३०/१२/२०१३ बाबत सदर प्रकरणी इकडील पत्र क्र. जिप-पंचायत-कावि-०९-१६३६ते१६४७-१२, दिनांक ७/१२/२०१२ च्या परिपत्रकानुसार कार्यवाही केलेली नाही. यावरून सदर नोंद नियमानुसार योग्य त्या विहीत कार्यपध्दतीचा अवलंब केला नसल्याचे सकृत दर्शनी निदर्शनास येत आहे. यास्तव **श्री.वसंत गुंडाप्पा देवताळे,व इतर ३ ग्रामपंचायत सदस्य,रा.सोमवार पेठ,ता.पन्हाळा यांचा दिनांक २७/६/२०१६ चा अर्ज मंजुर करणेत येत आहे. ग्रामपंचायत मिळकत क्रमांक १७२ बाबत ग्रामपंचायत मासिक सभा ठराव क्रमांक ५९/१ व २ दिनांक २४/१/२०१२ व मासिक सभा ठराव क्रमांक ५३/८ दिनांक ३०/१२/२०१३ हे ठराव रद्द करणेस सदरची स्थायी समिती मंजुरी देत आहे.**

सुचक - मा. भाग्यश्री भारत पाटील
अनुमोदक - मा. बाजीराव पुंडलिक पाटील
सूचना सर्वानुमते मंजूर

**विषय क्र. ७ :- सन २०१६-१७ या आर्थिक वर्षातील २० संकीर्ण सर्व समावेशक स्वरुपाची विकास कामे मधून तरुण मंडळांना क्रिडा, व्यायाम इत्यादी साहित्य पुरविणेकरीता र.रु.३३,००,०००/- मधील ई- निविदेतील मंजूर दर र.रु.२५९९४/- च्या दरास मान्यता मिळणेबाबत. (प्राथ.)**

**ठराव क्र.१२५०** **दिनांक ०९/१२/२०१६**

शिक्षण विभाग (प्राथमिक) जिल्हा परिषद, कोल्हापूर अंतर्गत सन २०१६-१७ या आर्थिक वर्षासाठी मा.मुख्य लेखा व वित्त अधिकारी जि.प.कोल्हापूर. यांचेकडील जाक्र.जिप.वित्त वशि.बजेट २०१६ दिनांक-२९/३/२०१६ अन्वये विविध योजनांची तरतूदीचे मूळ अंदाजपत्रक पत्र प्राप्त झालेली आहे.शिक्षण समिती मध्ये तरूण मंडळांना क्रिडा व व्यायाम इत्यादी साहित्य पुरविणे बाबतची ई- निविदा प्रक्रीया राबविणेत आली आहे.

तरी वरील प्रमाणे रक्कम - ३३,००,०००/- च्या निविदेमधून मे. सूरेश गुणकी , भालचंद्र स्टोअर्स , कराड यांचे दर सर्वात कमी आलेने सर्वात कमी दर रक्कम रूपये - २५,९९४/- प्रति संच याप्रमाणे रककम रूपये - ३२,७५,२४४/- इतक्या रक्कमेचे १२६ संच घेणेसाठी सदरच्या दरास या स्थायी समिती सभेमध्ये निधी खर्च करणेस व देयक अदा करणेस मंजूरी देणेत येत आहे.

सुचक - मा. हिंदुराव दादु चौगले
अनुमोदक - मा.धैर्यशिल संभाजीराव माने
सूचना सर्वानुमते मंजूर

**मा.उपाध्यक्ष :-** शिंगणापूर प्रशाळेबाबत पत्र आले आहे. त्यावर काय झाले ?

**मा.मु.का.अ. :-** चौकशी सुरु आहे.

**शिक्षण अधि. (प्राथ) :-** प्रशासन अधिकारी यांचे मार्फत चौकशी करुन अहवाल घेतो. सांघीक व वैयक्तीक बक्षीसाबाबत अनियमिततेचा हा विषय आहे. अग्रिम ताळमेळ घेत आहे. १० हजारचा हिशोब बाकी आहे.

**मा.धैर्यशिल माने :-** आंतर जिल्हा बदलीचे काय झाले ?

**शिक्षण अधि. (प्राथ) :-** याबाबत दि.२४/१०/२०१६ ला शासनाकडून बिंदू नामावली पूर्ण झाल्याशिवाय नाहरकत प्रमाणपत्र दयावयाचे नाही.

**मा.मु.का.अ. :-** आम्ही यादी पब्लिश करत आहोत.

**मा.हिंदुराव चौगले :-** आम्ही वारंवार मागणी करुन सुध्दा बाहेरचे लोक घेतलेले नाहीत. सन २०१३ नंतर कार्यवाही झालेली नाही. गेली ६ महिने यामध्ये कांही प्रगती झालेली नाही.
**मा.मु.का.अ. :-** रोष्टर मंजूर होईल अडचण नाही.
**मा.सभापती बांधकाम :-** सॅनटरी नॅपकीनचे पैसे मुलींच्या नावावर जमा करा.
**मा.मु.का.अ. :-** याबाबत सुध्दा शासनाची मान्यता घेवूया.
**मा.सभापती म.बा.क. :-** ग्रुप ग्रामपंचायत शिरगांव ता.चंदगड पैकी मौजे शिरगांव येथे स्वतंत्र ग्रा.पं.करणेकामी प्रस्ताव करणेत आला आहे. स्थायी समितीची शिफारस घ्यावी.

**विषय :- ग्रुप ग्रामपंचायत शिरगांव ता. चंदगड पैकी मौजे शिरगांव स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेस शिफारस मिळणेबाबत. (ग्रा.पं.)**

**ठराव क्र. :- १२५१** **दिनांक ०९/१२/२०१६**

गट विकास अधिकारी, पंचायत समिती चंदगड यांचेकडील जा.क्र./पंसचं/ग्राप/वशी/प्रस्ताव/१६, दि. १०/१०/०१६ च्या पत्रान्वये ग्रुप ग्रामपंचायत शिरगांव ता. चंदगड पैकी मौजे शिरगांव येथे स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेकामी प्रस्ताव सादर केलेला आहे. सदरचा प्रस्ताव अवलोकनी येता.

शासन निर्णय दि. १२ फेब्रुवारी २००४ चे तरतुदीच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे वस्तुस्थिती आहे.

| मौजे शिरगांव | | |
|---|---|---|
| अ.क्र. | निकष | वस्तुस्थिती |
| १ | महसुली गांव जाहीर होणे आवश्यक | आहे. |
| २ | पुर्नवसीत गाव आहे / नाही | नाही. |
| ३ | लोकसंख्या किमान २००० असणे आवश्यक, पाटबंधारे प्रकल्पामुळे प्रकल्प विस्थापितांच्या पुर्नवसनासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत करण्याकरीता किमान लोकसंख्या ३५० ते १००० असणे आवश्यक<br>आदिवासी व तांड भागासाठी तसेच २ गावातील ३ कि.मी पेक्षा अधिक अंतर असल्यास किमान लोकसंख्या -१००० | ११३० |
| ४ | आर्थिक परिस्थिती - दरडोई वार्षिक उत्पन्न किमान र.रू. ३०/- असणे आवश्यक पुर्नवसितांसाठी किमान र.रू. २०/- दरडोई उत्पन्न असणे आवश्यक | २१९.२९/- |
| ६ | स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेकरीता ग्रामस्थांची मागणी आवश्यक | आहे. |
| | ग्रामपंचायत ठराव | आहे.<br>ग्रामपंचायत मासिक सभा ठराव क्र. ४०, दि. ०८/०८/२०१६<br>ग्रामसभा ठराव क्र. ६५, दि. १५/०८/२०१६ |
| | ग्रामपंचायत निवडणूक होऊन किमान २ वर्षाचा कालावधी व ग्रामपंचायत मुदत संपण्यात आधी ६ महिने | मुदत दि. २४/११/२०१७ रोजी संपते. |
| | गट विकास अधिकारी यांची शिफारस | आहे. |

ग्रुप ग्रामपंचायत शिरगांव ता. चंदगड या गावाची लोकसंख्या १ असणाऱ्या ग्रामपंचायतीमध्ये मौजे शिरगांव, मजरे शिरगांव व इनाम सावर्डे हि महसुली गावे आहेत. पैकी मौजे शिरगांव या गावातील ग्रामस्थांनी स्वतंत्र ग्रामपंचायतची मागणी केलेली आहे. स्वतंत्र ग्रामपंचायतीची मागणी केलेल्या गावाची लोकसंख्या ११३०/- इतकी आहे. तथापी आदिवासी व तांड भागासाठी तसेच २ गावातील ३ कि.मी पेक्षा अधिक अंतर असल्यास किमान लोकसंख्या -१००० असणाऱ्या भागात स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेची बाब शासन निर्णय दि. १२/०२/२००४ मध्ये नमुद केलेली आहे.

स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करणेस ग्रामपंचायत मौजे शिरगांव च्या मासिक सभा व ग्रामसभा यांनी मान्यता दिलेले आहे.

प्रस्तुत प्रस्तावासोबत महसुली गावांबाबतचा दाखला, दोन्ही गावामधील अंतराचा दाखला ग्रामपंचायतीकडील खर्चाची अंदाजपत्रके, समजूतीचे नकाशे, जमीन महसूल क्षेत्र व गट नंबर्सची माहितीची पुर्तता केलेली आहे. गट विकास अधिकारी पंचायत समिती, चंदगड यांनी सदर ग्रामपंचायत स्थापन करणेकरीता शिफारस केलेली आहे. मुंबई ग्रामपंचायत अधिनियम १९५८ मधील कलम ४ व शासनाच्या निकषानुसार प्रस्तुत प्रस्तावास स्थायी समितीची शिफारस घेऊन मा. विभागीय आयुक्त पुणे विभाग, पुणे यांचे कार्यालयामार्फत सदरचा प्रस्ताव शासनास मान्यतेकामी सादर करणेस स्थायी समिती शिफारस करत आहे.

सुचक - मा. ज्योतिताई दिपक पाटील
अनुमोदक - मा.उमेश मुकुंदराव आपटे
सूचना सर्वानुमते मंजूर

यानंतर मा.सभापती, महिला व बाल कल्याण समिती यांनी सभेस उपस्थित असलेले सर्व पदाधिकारी, सदस्य, सर्व अधिकारी व खाते प्रमुख यांचे आभार मानले. तद्नंतर मा.अध्यक्ष यांच्या परवानगीने सभा खेळीमेळीत चालवणेस सहकार्य दिले बद्दल सर्वांचे आभार मानून सभा संपलेचे जाहीर केले.

कार्यवृत्तांत वाचला आणि कायम केला दिनांक ०९/१२/२०१६

**(चंद्रकांत ए. वाघमारे)**
सचिव तथा
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.प्र.)
जिल्हा परिषद, कोल्हापूर

सही/-
**(विमल पाटील)**
सभापती स्थायी समिती तथा
अध्यक्ष
जिल्हा परिषद,कोल्हापूर